**-: प्रेस नोट :-**

कक्ष-१०, गु.प्र.शा., गु.अ.वि., मरोळ, मुंबई दिनांक १०/१०/२०२१

**" ३ फॅक्टरी मेड ॲटो लॉक पिस्टल व ०१ रिव्हाल्वर सह १० जिवंत राऊंड विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारास कक्ष-१० गुन्हे शाखेने केले जेरबंद"**

दिनांक ०९/१०/२०२१ रोजी कक्षाचे **प्रपोनि श्री महेशकुमार ठाकुर** यांना गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली की, सुरेन रोड, गुरुनानक पेट्रोल पंपा जवळ, गोंविदवाडी, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी एक इसम बेकायदेशिर अग्निशस्त्राची विक्री करण्यासाठी येणार आहे. प्रपोनि श्री महेशकुमार ठाकुर यांनी सदरची माहिती मा. वरिष्ठांना अवगत करुन, कक्षाच्या अधिकारी व अंमलदाराचा सुसंगत व नियोजनबद्ध सापळा रचला होता.

दिनांक ०९/१०/२०२१ रोजी २३:२० च्या सुमारास रचलेल्या सापळयात अंधेरी मेट्रो स्टेशन कडुन घाटकोपरच्या दिशेने रहदारी मध्ये एक संशयीत पायी चालत येवुन सुरेन रोडच्या सुरवातीला, गुरुनानक पेट्रोल पंपा जवळ, गोंविदवाडी, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी थांबुन कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसुन आले. सदर इसम हाच अग्नीशस्त्र विक्रीस करण्यास आल्याबाबत गुप्त बातमीदाराने इशारा करताच पोलीस पथकाने त्यास घेराव घालुन जागीच ताब्यात घेतले. सदर इसमाची पंचा समक्ष घेतलेल्या झडती मध्ये त्याच्या कब्जातील बॅग मध्ये ०३ फॅक्टरी मेड ॲटो लॉक बनावटीची पिस्टल, ०१ रिव्हाल्वर व १० जिवंत काडतुसे मिळुन आली. सदर आरोपीता विरोधात एमआयडीसी पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करुन पुढील तपास गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. ३२/२०२१ (एमआयडीसी पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र.१०९/२०२१), कलम ३,२५ भाहका सह ३७(१)(अ),१३५ म.पो. का. अन्वये कक्षात घेण्यात आला आहे.

**हस्तगत मालमत्ता -**

**१) ०३ फॅक्टरी मेड ॲटो लॉक बनावटीची पिस्टल अं.कि. १,५०,०००/-**
**२) ०१ रिव्हाल्वर, अं.किं. ४०,०००/-**
**३) ०१ मोबाईल अं.किं. १०,०००/-**
**एकुण किंमत- २,००,०००/- रूपये**

**अटक आरोपीताचा तपशिल :-**

एक पुरुष, वय ३८ वर्षे, धंदा चालक, रा.ठी. धंदा चालक, रा.ठी. रुम नं १०४, आर्शिवाद बिल्डिंग, मालेवाडी, नविन पनवेल, नवी मुंबई.

अटक आरोपी विरुध्द नवी मुंबई परिसरात खंडणी, विनयभंग, पोक्सो, चोरी, मारामारी, घातक हत्यारे जवळ बाळगणे हया सारखे गुन्हे दाखल आहेत.

अशा प्रकारे कक्ष-१०, गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने ०७ पेक्षा जास्त गुन्हयात अटक असलेल्या सराईत गुन्हेगारास घातक ०४ अग्नीशस्त्र व जिवंत काडतुसासह जेरबंद केले आहे.

सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) गुन्हे शाखा, श्री. दत्ता नलावडे,मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम.अति.कार्य.) गुन्हे शाखा श्री. अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० गुप्रशा, मरोळ मुंबई येथील **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री महेशकुमार ठाकुर,** पोलीस निरिक्षक श्री किरण लोंढे, पालीस निरिक्षक श्री उत्तम भजनावळे, सहाय्यक पालीस निरिक्षक श्री वाल्मिक कोरे, पोलीस अंमलदार अहमद शेख, जगदीश धारगळकर, रामकिशन मोरे, चंद्रशेखर डफळे, स्वाप्निल खेडेकर, प्रकाश चव्हाण यांनी पार पाडली आहे.

**** D1/77/2021****